# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०६/१०/२०१६

**१) मारोती ओमनी व्हॅनची मोटार सायकलला धडक लागुन दोन जखमी . :–**

दिनांक ०४/१०/२०१६ रोजी २३.०० वा. दर. यातील फिर्यादी दिपक जागेश्वर अतकरी वय २५ वर्ष, रा. पिपरी पुनवर्सन जखमी हा आपल्या मित्रासह मोसावर डब्बलसिट बसुन एनएच ६ रोडने देवरी कडुन बेला येथे जात असतांना कुमार पेट्रोल पंप मुरमाडी समोरील झेब्रा क्रॉसीग रोडवर यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील व्हॅन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारुन फिर्यादी व त्याचा मित्र विजय टिचकुले वय २८ वर्ष, यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) काठीने मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक २४/०९/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील फिर्यादी गंगाधर श्रीराम सपाटे वय ४० वर्ष, रा. सुकळी हा आपल्या शेतात किरायाचे ट्रॅक्टरने नागरंनी करीत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस 'तु माझा धुरा का तासलास' असे बोलुन भांडण करुन डावे हाताचे अंगठयावर काठीने मारुन जखमी केल्याने व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२५,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन मारहान व दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/१०/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घराचे पोर्च मध्ये बसली असता तेव्हा यातील आरोपीतांनी संगनमत करुन पोर्च मध्ये येवुन 'तुझ्या मुलाने माझी कोंबडी लंगळी केली त्याचे पैसे दे' असे बोलुन शिविगाळ करुन थापडबुक्यांनी मारहान करुन धमकी देवुन आरोपी क्र. ०३ ने काठीने कुशीवर मारुन दुखापत केल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४४८,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.